दि.०७/१२/२०२३.

प्रेषक :- मा प्रशासक तथा आयुक्त,भि.नि.श.महानगरपालिका

प्रति :- नगरसचिव, भि.नि.श. महानगरपालिका

विषय - जनसंपर्क विभागाकरीता अंदाजपत्रकीय पुनर्वीनियोजन प्रस्तावा बाबत.

प्रस्तावना,

उपरोक्त विषयान्वये सन २०२३-२०२४ या वर्षात जाहिरात प्रसिध्दी व इतर छपाई प्रसिध्दी खर्च या लेखा शिर्षाअंतर्गत मुळ अंदाजपत्रकात रु.१.५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. माहे डिसेंबर अखेर पर्यंत रक्कम रु. १,४९,५८,४११/- इतका प्रत्यक्षात खर्च झालेला आहे. त्यामुळे रक्कम रुपये ४१,५८९/-इतकी तरतूद शिल्लक आहे.

पुढील चार महीन्यात वर्तमान पत्रातील जाहिराती, स्वच्छ सर्वेक्षण कामी, पल्स पोलिओ, आझादीका अमृत महोत्सव, वैद्यकीय आरोग्य विभागाकडील विविध उपक्रमे, शासनाचे इतर कार्यक्रम इत्यादी कामी जनजागृती करिता बॅनर्स, पोस्टर्स, स्टीकर्स व इतक छपाई कामी वाढ झालेला खर्च व अन्य देयके देणेकामी सदरची रक्कम कमी पडणार आहे. चालू आर्थीक वर्षात बांधकाम, विद्युत, पाणी पुरवठा, संगणक व इतर विभागाकडून तसेच स्वच्छ सर्वेक्षण, एम.आर. लसीकरण, मालमत्ता कर थकबाकीदार व धोकादायक घराची यादी या बाबत फ़ार मोठ्या प्रमाणात जाहिराती दिलेल्या आहेत. तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांकः सीएटी/२०१७/ प्र क्र ०८/ इमा-२, दि.२९ जून २०१७ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार शासन निर्णय परिच्छेद क्र.१ मधील १.२ नुसार रु.३ लक्ष ते रु.५० लक्ष पर्यंतच्या किंमतीच्या कामासाठी जिल्हास्तरीय एका मराठी वृत्तपत्रात व राज्यस्तरीय एका मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सदर ई-निविदा नोटीस प्रसिध्द करण्यात यावी असे परिपत्रक आहे. या प्रमाणे विकास कामांच्या निवीदांच्या जाहिरात एक इंग्रजी, एक राज्यस्तरीय व एक जिल्हास्तरीय अन्य वर्तमान पत्रात देणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार मा.व.ज-२०१८/प्र.क्र.३४८/३४ दि. २० डिसेंबर २०१८ अन्वये सर्व वर्तमान पत्राच्या जाहिरातीच्या दरात दोन ते तिन पटीने वाढ झालेली आहे. सुधारीत दरवाढीमुळे जाहिरातीवरील खर्चात फ़ार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

मागील या वर्षातील अंदाजे रु. ३० लाख इतकी वर्तमान पत्र जाहिरातीची देयक बाकी होती ती यावर्षीत लेखा विभागात वर्ग झाल्याने सदरची देयके देणे आवश्यक असल्याने आहे म्हणून या वर्षाच्या मुळे या वर्षीच्या मुळ अंदाज पत्रकातील रू. ८० लाख रुपये तरतूद कमी पडत आहे. पुढील चार महिन्याकरीता तरतूद शिल्लक कमी पडत असल्याने, सन २०२३-२०२४ च्या मुळ अर्थसंकल्पीय तरतूद रु.१.५० लाख या मध्ये किमान रक्कम रु.२५ लाख पूर्नविनयोजन करणे आवश्यक आहे. पुढील चार महीन्याकरीता तरतूद शिल्लक नसल्याने सन - २०२३-२०२४ च्या रक्कम रु.१.५० लाख या मुळ अंदाजपत्रकीय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम १०१ मुळ अर्थसंकल्प पुनर्वीनियोजन मा. स्थायी समितीच्या मान्यता मिळणेकामी आवश्यक आहे पण स्थायी समिती अस्तीत्वात नसल्याने त्याचे संपूर्ण अधिकारी पालिका प्रशासक यांना प्राप्त झालेले आहे. त्यानुसार अर्थसंकल्प पुनर्वीनियोजन प्रस्ताव मान्यतेस सविनय सादर.

**सोबत - नमुना क्र.१० नियम ३० (३) विवरण पत्र सादर करण्यात आलेले आहे.**

उप-आयुक्त (जनसंपर्क)
भिवंडी नि.शहर महानगरपालिका

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.**

दि. १८/१२/२०२३.

ठराव क्र. ३०८

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांकः प्रतिनि-२०२३/प्र.क्र.११९/नवी-१४, दि.०९/०६/२०२३ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१ अ) तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवांडी नि. शहर महानगरपालिका, जनसंपर्क अधिकारी यांनी प्रस्तावित केल्यानुसार व उप आयुक्त (जनसंपर्क), लेखा व वित्त अधिकारी, अतिरिक्त आयुक्त यांनी शिफ़ारस केल्यानुसार निविदा नोटीस व इतर छपाई प्रसिध्दी खर्च याकामी अंदाजपत्रकीय निधी तरतुदीचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ व लेखा संहिता-१९७१ मधील नियम ३० (३) अन्वये सोबत जोडलेल्या विवरणपत्रनुसार दर्शविल्या प्रमाणे आपत्कालीन परिस्थितीत करावा लागणारा खर्च या लेखा शिर्षक रु.२ कोटी तरतूद आहे. यामध्ये प्रत्यक्ष झालेला खर्च रु. ९२,४०,१५०/- इतका झालेला आहे. व रक्कम रु.१,०७,५९,८५०/- इतकी शिल्लक आहे. या शिल्लक रक्कमेतून रक्कम रु.२५,००,०००/- (रु. पंवीस लक्ष मात्र) निविदा नोटीस व इतर जाहिरात प्रसिध्दी खर्च लेखाशिर्षात वर्ग/पुनर्वीनियोजन करणे तसेच छपाई साहित्य (बॅनर्स, पोस्टर्स, स्टीकर्स, हस्तपत्रीका व इतर छपाई साहित्य) पुरविणेकामी होणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.शहर महानगरपालिका

नमुना क्र. १०

नियम ३० (३) पहा

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

दि. /११/२०२३ च्या सभेत सादर केलेले पुनर्विनियोजनाचे विवरणपत्र

| या लेखाशिर्षातुन | | | | | | या लेखाशिर्षाकरिता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यंत खर्च | आज तारखे पर्यंत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च | अभिप्राय |
| १) | अ बजेट महसुली खर्च भाग –डी-१ पान नं.८५ | आपत्कालीन परिस्थितीत करावा लागणारा खर्च | २ कोटी | ८३,९५,९५०/- | १,१६,०४,०५०/- | अ बजेट महसुली खर्च भाग - २, बि-८ पान नं.१९ | निविदा नोटीस व इतर जाहिरत प्रसिध्द खर्च | १.५० लाख | १,४९,५८,४११/- | २५ लाख | शासणनिर्णय परीपत्रकानुसार एक जाहीरात कीमान,हिंदी,इंग्रजी व मराठी वृत्त पत्रात देण्याचे आदेश प्राप्त आहे.एक निविदा दोन ते तिन वेळा प्रसिध्द करावी लागते तसेच स्वच्छ सर्वेक्षण, एम.आर लसीकरण व मालमत्ता कर थकबाकी दार यांच्या जाहिराती कामी झालेला खर्च तसेच बॅनर्स,होर्डीग,हस्तपत्रिका, स्टीकर्स व इतर छपाई साहित्य खरेदी करणे व इतर खर्च त्यामुळे खर्चात वाढ झालेली आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जनसंपर्क अधिकारी<br>भिवंडी नि.शहर मनपा | आपत्कालीन वि. प्रमुख<br>भिवंडी नि.शहर मनपा | मुख्य लेखा परिक्षक<br>भिवंडी नि.शहर मनपा | मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>भिवंडी नि.शहर मनपा | अति. आयुक्त<br>भिवंडी नि.शहर मनपा | प्रशासक तथा आयुक्त<br>भिवंडी नि.शहर मनपा |